# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/२०१९ दि. ३१ डिसेंबर,२०१९

जळगाव दि.३१ ( ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचा अठ्ठाविसावा दीक्षांत समारंभ शनिवार दि.४ जानेवारी, २०२० रोजी होत असून या समारंभासाठी माजी व्यवस्थापकीय संचालक आणि प्रमुख वस्तू व्युत्पन्न व्यापार, सिटी बँक, अमेरिका येथील श्री. सुनील देशमुख हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. अशी माहिती कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सकाळी १० वाजता विद्यापीठाच्या दीक्षांत सभागृहात हा समारंभ होत असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरु प्रा.पी.पी.पाटील हे राहणार आहेत. विद्यापीठाच्या www.nmu.ac.in या संकेतस्थळावर स्नातकांसाठी डिग्री कोड देण्यात आला आहे. याशिवाय मोबाईल मॅसेजद्वारे देखील डिग्री कोड पाठविण्यात आला आहे. स्नातकांनी पदवी ग्रहण करण्यासाठी सभारंभाच्या दिवसी प्राप्त झालेला डिग्री कोड, ओळखदर्शक कागदपत्रांसह उपस्थित रहावे. स्नातकांना पदवी प्रमाणपत्र मिळणे सोयीचे व्हावे, याकरीता पदवी प्रमाणपत्राचे वाटप अभ्यासक्रमनिहाय प्रशासकीय इमारतीत अकारा काऊंटरवर देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. त्याचा तपशील विद्यापीठाच्या संकेतस्थाळावर देण्यात आला आहे. दिव्यांग स्नातकांसाठी सर्व अभ्यासक्रमाचे पदवी प्रमाणपत्र चौकशी कक्ष येथे उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. समारंभास्थळी सकाळी ९ वाजता विद्यार्थ्यांनी / निमंत्रितांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. प्रशासकीय इमारती जवळ स्नातकांसाठी सेल्फी स्टँड उभारण्यात आला आहे.

या दीक्षांत समारंभात ३८ हजार २८२ स्नातकांना पदव्या बहाल करण्यात येणार आहेत. यामध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे १६ हजार ३३९ स्नातक, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे ६ हजार ५०३ स्नातक, मानव्य विद्याशाखेचे १४ हजार ३३३ आणि आंतर विद्याशाखेचे १हजार १०७ स्नातकांचा समावेश आहे. या शिवाय स्वायत्त असलेल्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयाचे बी.टेक.चे ४५८ आणि एम.टेक. चे ०५ अशी एकूण ४६३ विद्यार्थ्यांना देखील पदवी बहाल केली जाणार आहे. गुणवत्ता यादीतील ९५ विद्यार्थ्यांना या समारंभात सुवर्णपदक दिले जाणार आहे. या मध्ये ६१ विद्यार्थिनी व ३४ विद्यार्थ्यांचा समावेश

आहे. या समारंभात प्रत्यक्ष पदवी घेण्यासाठी २० हजार३१८ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून त्यामध्ये २५० पीएच.डी. धारक विद्यार्थी आहेत. या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण (live) विद्यापीठाच्या संकेतस्थळावर होणार आहे. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना हा कार्यक्रम थेट प्रक्षेपणाद्वारे पाहता यावा याकरीता महाविद्यालयात सोय करण्यात आली आहे. या पत्रकार परिषदेला प्र-कुलगुरु प्रा.पी.पी.माहूलीकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक बी.पी.पाटील, विशेष कार्यअधिकारी प्रा.ए.यु.बोरसे उपस्थित होते.

---

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनंसपर्क अधिकारी